# MARATHI-(Code 009)
# MARKING SCHEME
# Class X (2025-26)

Time: 3 hrs. Max. Marks: 80

| | | | |
|---|---|---|---|
| | | **विभाग - 'अ' - वाचन व आकलन - 15 गुण** | |
| **प्रश्न 1.** | **अ)** | **प्रश्न1) उतारा वाचून त्याआधारे खालील प्रश्नांची उत्तरे दिलेल्या पर्यायांतून निवडा आणि लिहा. (कोणतेही 5)** | **5** |
| | 1. | C) अन्नाची चव बिघडू शकते किंवा रंग बदलू शकतो | |
| | 2. | C) टिन (कथील) | |
| | 3. | D) नवसागर (अमोनिअम क्लोराइड) | |
| | 4. | B) पाण्यात टाकले जाते | |
| | 5. | B) 'कल्हईवालाऽऽ!' | |
| | 6. | B) थंड | |
| | **ब)** | **खालील प्रश्नांची उत्तरे उताऱ्याच्या आधारे एका वाक्यात लिहा.(कोणतेही 3)** | **3** |
| | 1. | नवसागर (अमोनियम क्लोराइड) भांड्याला स्वच्छ आणि लख्ख करण्यासाठी वापरला जातो. ते भांडे गरम करून नवसागराची भुकटी वापरून भांडी घासली जातात, ज्यामुळे भांडी स्वच्छ आणि चमकदार होतात. | |
| | 2. | तांब्याच्या भांड्यांना काही महिन्यांनी कल्हई करणे आवश्यक असते, कारण त्यामुळे अन्नाची सुरक्षितता आणि भांड्याची टिकाऊपणाची क्षमता राखली जाते. | |
| | 3. | कल्हई करण्याच्या प्रक्रियेत भांडे तप्त करून त्यावर कथील धातूचा थर लावला जातो, ज्यामुळे भांडे सुरक्षित आणि टिकाऊ बनते. | |
| | 4. | कल्हई प्रक्रिया पूर्ण झाल्यावर भांडे थंड पाण्यात टाकले जातात. यामुळे भांडी थंड होतात आणि त्यावरचे अतिरिक्त टिन (कथील धातू) व्यवस्थित जडतात. तसेच, भांडी अजून अधिक शुद्ध आणि सुरक्षित होतात. | |
| **प्रश्न 2.** | **अ)** | **प्र.2) खालील कविता काळजीपूर्वक वाचा व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिलेल्या  पर्यायांतून निवडा आणि लिहा. (कोणतेही 4)** | **4** |
| | 1. | B) भाषेशी | |
| | 2. | B) रत्न-कांचनासारखे | |
| | 3. | B) नाना बोली | |
| | 4. | C) भाग्यवंत | |
| | 5. | A) रानवाऱ्याच्या | |
| | **ब)** | **कवितेच्या आधारे खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.(कोणतेही 3)** | **3** |
| | 1. | दूर देशात | |
| | 2. | शीतलता. | |
| | 3. | अमृताचे. | |
| | 4. | आईच्या मायेच्या रूपात. | |
| | 5. | ऋण | |
| | | **विभाग – ब – व्याकरण – 20 गुण** | |
| **प्रश्न 3.** | **अ)** | **सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा.(कोणतेही 4)** | **4** |
| | 1. | ब] प्रामाणिकपणा | |
| | 2. | ड] सर्वनाम | |
| | 3. | क] वर | |
| | 4. | क] नाजूक | |

| | | | |
|---|---|---|---|
| | 5. | अ] म्हणून | |
| | **ब)** | **सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा.(कोणतेही 3)** | **3** |
| | 1. | राम दररोज ग्रंथालयात जातो./ राम दररोज ग्रंथालयात जात असतो./ राम दररोज ग्रंथालयात जात आहे. | |
| | 2. | भूतकाळ | |
| | 3. | अभिषेक पायांचे ठसे पाहिलं./ अभिषेक पायांचे ठसे पाहणार. | |
| | 4. | वर्तमानकाळ | |
| | **क)** | **सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा.(कोणतेही 3)** | **3** |
| | 1. | विधानार्थी वाक्य | |
| | 2. | त्याच्या बोलण्यात सत्यता होती./ त्याच्या बोलण्यात खरेपणा होता. | |
| | 3. | तू व्यायाम कर. | |
| | 4. | तुझा अवाका खूप मोठा आहे. | |
| | **ड)** | **सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा.(कोणतेही 2)** | |
| | 1. | खेडे | **2** |
| | 2. | दोऱ्या | |
| | 3. | तिने दारात रोपे लावली. | |
| **प्रश्न 4.** | **अ)** | **सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा.(कोणतेही 2)** | **2** |
| | 1. | B) शाळा | |
| | 2. | B) रस्ता - रस्ते | |
| | 3. | A) पक्षी | |
| | **ब)** | **सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा.(कोणतेही 2)** | **2** |
| | 1. | B) अंत | |
| | 2. | C) कुतूहल | |
| | 3. | D) पुसट – अस्पष्ट | |
| | **क)** | **सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा.(कोणतेही 2)** | **2** |
| | 1. | C) बिनविरोध | |
| | 2. | A) जुना × नवीन | |
| | 3. | B) अमावस्या | |
| | **ड)** | **सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा.(कोणतेही 2)** | **2** |
| | 1. | A) तीन नेत्रांचा समूह | |
| | 2. | D) एकवीस | |
| | 3. | D) समाहार द्वंद्व | |
| | | **विभाग –'क' – पाठ्यपुस्तक आधारित – 30 गुण** | |

| | | | |
|---|---|---|---|
| **प्रश्न 5.** | **अ)** | **एका वाक्यात उत्तरे लिहा.(कोणतेही 3)** | **3** |
| | 1. | अब्दुल वर्षातून २ वेळा तपोवनात जात असे. | |
| | 2. | स्वच्छतेची भोक्ती स्नेहल होती. | |
| | 3. | कवी - नारायण सुर्वे | |
| | 4. | डॉ. माशेलकरांनी 'माझे संस्कार केंद्र' असे माझी आई, माझी शाळा व माझे शिक्षक यांना म्हटले आहे. | |
| | 5. | कथेची थोरली बहीण कादंबरी आहे. | |
| | **ब)** | **खालील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य पर्याय शोधून वाक्य पुन्हा लिहा.(कोणतेही 3)** | **3** |
| | 1. | C) विमान | |
| | 2. | A) लाखमोलाचा | |
| | 3. | D) सूर्यकिरणांची | |
| | 4. | B) भडसावळे | |

| | | | |
|---|---|---|---|
| | 5. | D) अभाग्यांना | |
| | **क)** | **खालील प्रश्नाचे ३० ते ४० शब्दात उत्तर लिहा.(कोणतेही 1 )** | **3** |
| | 1. | उत्तर – प्रस्तावना- 'उपास' या पाठात पु.ल.देशपांडे यांनी उपासाचे विनोदी वर्णन केले आहे.<br>वजन कमी करण्यासाठी पंतांच्या सहकाऱ्यांनी विविध उपाय सुचवले. त्यांच्या कार्यालयातील कु. कमलिनी केंकरेने त्यांना दोरीवरच्या उड्या मारा म्हणजे तुमचे वजन कमी होईल असे सांगितले. म्हणून पंतांनी दोरीवरच्या उड्यांचा फक्त एकदा प्रयत्न केला व त्यांची पहिली उडी ही शेवटची उडी ठरली. पंतांना त्यांच्या आठ बाय दहाच्या दिवाणखान्यात दोरी फिरवणे अवघड वाटत होते. त्यांनी फिरवलेली दोरी पलीकडे गेली ती ड्रेसिंग टेबलावरच्या तेलांच्या व औषधांच्या बाट**ल्या** खाली घेऊन आली. दुसऱ्यांदा अर्धवट गॅलरी व अर्धवट घरात राहून फिरवलेली दोरी आचार्य बाबा बर्व्यांच्या गळ्यात अडकली. अशाप्रकारे दोरीवरच्या उड्या मारण्याच्या प्रसंगातून कसा विनोद घडला याचे रोचक वर्णन पु.लं.नी केले आहे. | |
| | 2. | उत्तर: प्रस्तावना- फूटप्रिंट्स या पाठात प्रदीप आवटे यांनी पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व विषद केलेले आहे.<br>वातावरणात ग्लोबल वॉर्मिंगचे प्रमाण वाढताना दिसत आहे. मानवाने विज्ञानाच्या जोरावर अनेक नवनवीन तंत्रज्ञान विकसित केले आहे. मानवनिर्मित घटकांचा वापर करत असताना निसर्गाची हानी होत आहे.<br>प्रत्येकजण दळणवळणासाठी वैयक्तिक वाहनांचा वापर करताना दिसतो. या वाहनांमुळे वातावरणात खूप मोठ्या प्रमाणात कार्बन मिसळत असतो. वृक्षतोड करून मोठमोठ्या इमारती उभारल्या जातात. झाडे नष्ट झाल्याने वातावरणातील ऑक्सिजनचे प्रमाण कमी होत आहे. त्यामुळे वातावरण प्रदूषित होत आहे. म्हणून लेखक रेखामावशीचे उदाहरण देतात. रेखामावशीच्या पायाला लागलेली धूळ त्यामुळे फरशीवर उमटणारे ठसे सहज पुसता येतील; पण आपण वातावरण दररोज कळत नकळत प्रदूषण करत असतो. त्याचे उमटलेले ठसे म्हणजेच ‘आपल्या पायांचे वातावरणात उमटलेले ठसे, मात्र आपल्याला सहजतेने पुसता येणार नाहीत'. असे लेखकाला या ठिकाणी सूचित करायचे आहे. | |
| | 3. | उत्तर - प्रस्तावना- ‘खरा नागरिक’ या पाठात लेखक ‘सुहास बारटक्के’ यांनी शालेय विषय केवळ अभ्यासायचे नसून आचरणात आणायचे असतात, हे ‘निरंजन’ या व्यक्तिरेखेतून स्पष्ट केले आहे.<br>नियमांचे पालन, सामाजिक कार्यात मदत व आपल्या शिक्षणाचा योग्य वेळी उपयोग करणे हे आदर्श विदयार्थ्यांचे गुणविशेष आहेत. गर्दीच्या ठिकाणी वृद्धांना अपंगांना साथ देणे, रेल्वेत चढता उतरतांना त्यांना हात देणे, रस्ता पार करण्यास मदत करणे, परिसरात कचरा होऊ न देणे, प्लास्टीकचा वापर टाळण्यास लोकांना समजावणे तसेच आजुबाजूच्या अशिक्षित मुलांना शिक्षणात मदत करणे व पुढे आणणे अशी अनेक कामे विदयार्थी सहज करू शकतात. ही कामे करण्यास त्यांना पैशाची गरज भासत नाही. मात्र इच्छेची आवश्यकता असते. 'आधी केले मग सांगितले.' या वचनाप्रमाणे स्वत: कार्यास सुरूवात करून ते इतरांना प्रोत्साहन देऊ शकतात. स्वच्छता, गोरगरीबांना मदत ही कामे घर, शाळा व स्वत:च्या परिसरातच ते करू शकतात. झाडे लावणे - वाढवणे इत्यादी कामांतून आनंद तर मिळतो पण पर्यावरणाचे रक्षणही होते. छोट्या कामांतून मोठे हित हे आदर्श विदयार्थ्याचे गुण विशेष होय. | |
| | **ड)** | **खालील वाक्यातील वाक्प्रचार ओळखा व त्याचा अर्थ कंसातील कोणत्या वाक्प्रचाराशी जुळतो ते लिहा.** | **5** |
| | 1. | हृदयाशी धरले - प्रेमाने जवळ घेणे | |
| | 2. | अभिमानानं भरून आला - खूप आनंद वाटणे | |
| | 3. | मळमळ व्यक्त केली - नाराजी व्यक्त करणे | |
| | 4. | उसंत लाभली नाही - रिकामा वेळ न मिळणे | |
| | 5. | पारंगत झालेले - निपुण असणे | |
| | | | |
| **प्रश्न** | **अ)** | **खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही 4)** | **4** |

| | | | |
|---|---|---|---|
| **6.** | | | |
| | 1. | चातक पक्षी हा मेघांची विनवणी करत आहे. | |
| | 2. | कवीने चंद्राला भाकरीची उपमा दिली आहे. . | |
| | 3. | जवानाचे औक्षण दीनदुबळे करत आहेत. | |
| | 4. | कवी शक्तीची नौबत झडते असे म्हणतात. | |
| | 5. | संत नामदेवांनी स्वतःला श्री विठ्ठलाचे दास म्हटले आहे. | |
| | 6. | जेव्हा मुठीमध्ये द्रव्य नसते तसेच शिरेमध्ये रक्त नसते, तेव्हा कष्टाचे सामर्थ्य अपुरे वाटते. | |
| | **ब)** | **रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.(कोणतेही 4)** | **4** |
| | 1. | C) काजा | |
| | 2. | A) बंबारा | |
| | 3. | C) युगाचे | |
| | 4. | C) कलम | |
| | 5. | B) श्रावण | |
| | **क)** | **खालीलपैकी कोणत्याही एकाचे संदर्भासह स्पष्टीकरण करा. (कोणतेही1)** | **3** |
| | 1. | **संदर्भ** – 'दोन दिवस' या कवितेत कवी नारायण सुर्वे यांनी जीवनाचे वास्तव चित्र रेखाटताना 'भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली हे जीवन सत्य मांडले आहे.<br>**स्पष्टीकरण-** कवीने वरील ओळीमध्ये आपले दुखः प्रकट करतांना आपल्या भावनांचे झालेले दमन जीवनातल्या सर्व आशा , उमेदी या दारिद्राने कशा जखडल्या गेल्या आणि नष्ट झाल्या. या दाहक वेदना होत असतांना देखील कवीने कोणत्याही प्रकारची चीड ,संताप व्यक्त न करता आपल्या वेदनेला संयमाने मांडले आहे.<br>सर्वस्व असलेले हात- कवीचा आत्मा, कवीचे संपूर्ण अस्तित्व दारिद्रय जीवनाचे वास्तव.<br>माना उंचावलेले हात- आशेने उंचावलेले हात. कलम झालेले हात- जीवनाच्या दाहक वास्तवाने निराशेने खाली झुकलेले हात.<br>**वैशिष्ट्य-** वरील ओळीतून कवीची तडफड, दुःख, वेदना मनाला अंतर्मुख करून जाते. | |
| | 2. | **संदर्भ** – 'औक्षण' या कवितेत कवयित्री इंदिरा संत सीमेवर लढायला जाणाऱ्या जवानांना संबोधून त्यांचे औक्षण करतांना या काव्यपंक्ती वापरत आहे.<br>**स्पष्टीकरण-** युध्दभूमितील बंदूकाना ,तोफांना धैर्याने समोर जाणारा जवान पराक्रमी व जिद्दीचे पाऊल टाकणारा आहे. प्राणपणाने लढून तो विजयी होणार यात शंका नाही. ती विजयाची दौड कवयित्रीला आपल्या डोळ्यांनी पहायची आहे. डोळ्यातील आसवांनी अनेक ज्योती लावाव्या व त्याचे औक्षण करावे असे कवयित्रीला वाटते.<br>**वैशिष्ट्य**- जवानांकरिता अत्यंत आदरभाव नमूद केला आहे. | |
| **प्रश्न 7.** | | **खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही 5)** | **5** |
| | 1. | मराठीतील 'आग' हा शब्द संस्कृतमधील अग्नी या शब्दापासून आला आहे. | |
| | 2. | लेखकाने 'बार्क' मधील दोन अनुभव सांगितले आहेत. | |
| | 3. | १९३८ साली मुंबई येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष स्वातंत्र्यवीर सावरकर होते. | |
| | 4. | 'मोठे होत असले**ल्या** मुलांनो' या पाठात लेखकाला मेटलायझिंग प्रक्रियेवर काम करण्यास सांगण्यात आले. | |
| | 5. | व्युत्पत्ती म्हणजे शब्दाच्या अर्थाचे किंवा शब्दाच्या मुळाचे ज्ञान. | |
| | 6. | भारतात अणुसंशोधनाचा पाया डॉ. होमी भाभा यांनी घातला. | |
| | 7. | मराठी व्युत्पत्ती कोशाचे पहिले प्रकाशन १९४६ साली झाले. | |
| | | **विभाग - ड – लेखन कौशल्य – 15 गुण** | |
| **प्रश्न** | **अ]** | **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे 120 – 150 शब्दांत लेखन करा.** | 5 |

| | | | |
|---|---|---|---|
| **8.** | | | |
| | | **निबंध आवश्यक मुद्दे –**<br>आकर्षक सुरूवात व परिणामकारक शेवट,<br>विषयविस्तार, तर्कशक्ती, उपयोजन कौशल्य, मुद्देसूद लेखन,<br>योग्य विरामचिन्हांचा वापर, शुद्धलेखन,<br>काव्यपंक्ती, वाक्प्रचार, म्हणींचा सुयोग्य वापर.<br>**कथा आवश्यक मुद्दे –**<br>कथेला समर्पक शीर्षक,<br>आकर्षक प्रारंभ व समर्पक शेवट,<br>ओघवती भाषाशैली, उत्कंठावर्धक मांडणी,<br>मुद्देसूद मांडणी, कल्पकता, रंजकता,<br>संवाद व विरामचिन्हांचा यथायोग्य वापर<br>– दोन्ही लेखन प्रकारात यांचा सारासार विचार करून गुणदान. | |
| | **ब ]** | **खालील विषयावर पत्र लिहा. (लिफाफा आवश्यक) (कोणतेही 1)** | 5 |
| | | **आवश्यक मुद्दे –**<br>**दिनांक –** पत्राच्या सुरूवातीला वरच्या डाव्या कोपऱ्यात लिहावा.<br>**मायना –** ज्यांना पत्र पाठवायचे त्यांना डावीकडे अभिवादनासह संबोधित करावे.<br>**विषय –** मोजक्या शब्दांत लिहावा.<br>**मजकूर –** मजकूर विषयाशी संबंधित त्रोटक व नेमका असावा. समर्पक, मुद्देसूद रचना असावी. भाषा व्यावहारिक व भारदस्त असावी.<br>**शेवट व समारोप –** पत्राचा शेवट करताना डावीकडील खालच्या कोपऱ्यात पत्र पाठविणाऱ्याचे नाव, पत्ता असावा.<br>पत्रलेखनात दोन्ही पत्ते, दिनांक, विषय या सर्व गोष्टी पत्राच्या डाव्या बाजूलाच असाव्यात.<br>**टीप –** लिफाफा आवश्यक (हे पत्रलेखन आहे. ई-मेल नाही. त्यामुळे पत्र लिहिल्यानंतर शेवटी ई-मेल लिहिला नसेल, तरी चालेल.)<br>**गुण विभागणी –**<br>दिनांक व मायना – १ ,<br>विषय – ०.५,<br>मजकूर – २,<br>शेवट व समारोप – ०.५<br>लिफाफा- १ | |
| | **क]** | **खालील दिलेल्या विषयावर जाहिरातलेखन करा. [कोणतेही १]** | **5** |
| | | **आवश्यक मुद्दे** –<br>• आकर्षक मजकूर<br>• साधी,सोपी आकर्षक, स्पष्ट, ओघवती भाषा<br>• ग्राहकांच्या मनात विश्वासार्हता<br>• वेचक,अर्थपूर्ण<br>• वाचकांशी संवाद साधणारी | |